# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-१७५/२०२२३

**अपिलार्थी, श्री.अनंता दत्तू टेंभे,**
**मु.नवगाव (बापसई), पो.मामनोली,**
**ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१**

विरुध्द

जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत विभाग,
जिल्हा परिषद ठाणे यांचे कार्यालय,
२२ नं.सर्कल, मिलेनियम टोयोटा शो-रुम जवळ,
जीएसटी भवन समोर, वागळे इस्टेट,
ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०४.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, ग्रामपंचायत विभाग,
जिल्हा परिषद ठाणे यांचे कार्यालय,
रोड नं.२२, मिलेनियम टोयोटा शो-रुम जवळ,
जीएसटी भवन समोर, वागळे इस्टेट,
ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०४.

**व्दितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ५.५.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.१०.२०२२ | ---- | ३०.११.२०२२ | ----- |

अपिलार्थी यांनी दि.२३.१.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर व्दितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर व्दितीय अपिलावर आज दिनांक ५.५.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विवेक पवार, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, ग्रामपंचायत विभाग,जिल्हा परिषद ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(उप आयुक्त (आस्थापना) कोकण विभाग, नवी मुंबई यांच्या कडील पत्र क्र.विशा/ग्रांप ३/कार्या.३-३/ कांबा/आ.क्र.४०७३/२०२२/५४४,दि.१८.०२.२०२२ नुसार आपल्या कार्यालयास प्राप्त अहवालांच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.६.२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, "*१. अपिल अमान्य. २. श्री. राजेंद्र काशिनाथ शिरोसे, रा. कांबा, ता. कल्याण यांनी दाखल केलेल्या तक्रारीबाबत श्री. अनंता दत्तू टेंभे, मु. नवगांव (बापसई) पो. मामनोली, ता. कल्याण यांनी माहिती मागितलेली असल्याने माहिती अधिकार अर्जान्वये सदर बाबतची माहिती देणे उचित होणार नसल्याने तसेच श्री. राजेंद्र काशिनाथ शिरोसे, रा. कांबा, ता. कल्याण, अध्यक्ष, कोकण विभाग माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समिती यांनी दि.३.१२.२०२२ रोजी त्यांनी दि.२५.१.२०२२ रोजी मा. उप आयुक्त (आस्थापना) कोकण विभाग यांचेकडे केलेल्या तक्रारी विषयीचा पत्रव्यवहार व त्याबाबतची माहिती त्यांचे परवानगी शिवाय कोणासही देण्यात येऊ नये अशी विनंती केलेली असल्याने अपिलकर्ता श्री. अनंता दत्तू टेंभे यांना सदरची माहिती देता येणार नाही.*" असे आदेश पारित केले आहेत.

या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना ३० दिवसांच्या कालावधीमध्ये काहीही न कळविल्यामुळे त्यांनी प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दि.६.२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन वर नमूद केल्याप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या निवेदनावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी ज्या तक्रार अर्जाच्या संदर्भात प्राप्त अहवालाची माहिती मागितली आहे ती तक्रार श्री.राजेंद्र काशिनाथ शिरोसे यांनी विभागीय आयुक्त, कोंकण विभाग

यांच्याकडे केली होती. या तक्रारीमध्ये ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत असणा-या श्री. बाळू उंद्रु कोंकणे यांच्या अनियमित भ्रष्ट कारभाराबाबत तसेच बेहिशेबी संपत्ती जमा केल्याबाबत तक्रार होती. वरील तक्रार श्री. राजेंद्र काशिनाथ शिरोसे यांनी केल्याने ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे असे समजून त्यांचे मत मागविण्यात आले होते व त्यांनी हरकत घेतली असल्याने सदरची माहिती अपिलार्थींना देता आली नाही.

श्री. राजेंद्र काशिनाथ शिरोसे यांनी केलेली तक्रार पाहता या तक्रारीमध्ये नमूद बाबी या श्री. राजेंद्र काशिनाथ शिरोसे यांची वैयक्तिक स्वरूपाची माहिती आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी श्री. राजेंद्र काशिनाथ शिरोसे यांचे मत मागविण्याची आवश्यकता होती असे आयोगास वाटत नाही. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विचारणा केली व त्यांनी हरकत घेतली असल्याने श्री. राजेंद्र काशिनाथ शिरोसे यांचे मत घेणे आवश्यक आहे. सबब, पुढील सुनावणीसाठी श्री. राजेंद्र काशिनाथ शिरोसे यांना सुनावणीची नोटीस काढण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२.६.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ५ मे, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**श्री. राजेंद्र काशिनाथ शिरोसे, मु. कांबा, पो.वरप, ता. कल्याण, जि. ठाणे.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,**
**दालन क्र. ५२७ व ५२८, ५ वा मजला,**
**कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**